| MHAH180006402023 | केस दाखल दिनांक | १७/०३/२०२३ |
|---|---|---|
| | केस नोंदणी दिनांक | १७/०३/२०२३ |
| | केस निकाल दिनांक | ०७/०१/२०२६ |
| | कालावधी | वर्ष महिने दिवस<br>०२ ०९ २१ |

भाग – अ

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (i) अन्वये)

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (कोर्ट क्र.३), राहुरी यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – आदित्य कृ. शिंदे)**

न्यायनिर्णय घोषीत दि. ०७/०१/२०२६

**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३२१/२०२३)** **निशाणी क्र. ६ लगत**

गुन्हा नोंद क्र. III १२१८/२०२२, राहुरी पोलीस स्टेशन, राहुरी.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | : | **महाराष्ट्र शासन** मार्फत<br>ठाणे अंमलदार, राहुरी पोलीस स्टेशन,<br>ता. राहुरी, जिल्हा –अहमदनगर. |
| अभियोग पक्षातर्फे | : | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. एस. गांधले. |
| आरोपी | : | **काळु उर्फ मुन्ना लक्ष्मण पवार,**<br>वय–४४ वर्षे, धंदा– मजुरी,<br>रा. सात्रळ, ता. राहुरी, जि. अहमदनगर. |
| आरोपी तर्फे विधीज्ञ | : | **ॲड. श्री. व्ही. ए. होले.** |

भाग – ब

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २७/११/२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २७/११/२०२२ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | १७/०३/२०२३ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | २८/०६/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | २८/०६/२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | :– | ०७/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ०७/०१/२०२६ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयातील शिक्षेसदर्भात आदेशाचा दिनांक | :– | –– |

**<u>आरोपीची माहिती</u>**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **काळु उर्फ मुन्ना लक्ष्मण पवार** | –– | –– | महाराष्ट्र प्रो. कायद्याचे कलम ६५(फ), (क), (ड) व (ई) अन्वये | निर्दोष मुक्तता | –– | –– |

**<u>न्यायनिर्णय</u>**

(घोषित केल्याचा दिनांक – ०७/०१ /२०२६)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(फ),(क), (ड) व (ई) अन्वये शिक्षेस पात्र अपराधाकरीता खटला चालविण्यात आला.

**<u>अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>–**

२. पोलीस कॉन्स्टेबल श्री. नितीन जगन्नाथ शिरसाठ यांनी फिर्याद दिली की, ते दिनांक २७.११.२०२२ रोजी सकाळी ०६.३० वाजताचे सुमारास राहुरी पोलीस स्टेशन येथे नेमणूकीस असताना अवैध धंद्यावर कारवाई करणे करिता मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. संदिप मिटके साहेब यांनी त्यांच्या कार्यालयात बोलावून कळविले की, त्यांना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, सात्रळ गावात नदीचे कडेला इसम नामे काळु लक्ष्मण पवार हा हातभट्टीची दारू तयार करत आहे. अशी माहिती मिळाल्याने आम्ही सर्व स्टाफ व

दोन पंच यांना बोलावून घेतले व सात्रळ येथे सरकारी वाहनाने बातमीतील नमुद ठिकाणी गेले असता त्यांना एक घराच्या भिंतीच्या आडोशाला चुलीवर एका मोठया लोखंडी टिपाडाखाली एक इसम जाळ घालून टिपाडातील रसायन हालवत असताना त्यांना दिसला. तो इसम पोलीसांची चाहुल लागताच तेथून पळून गेला. त्याचा पाठलाग केला परंतु तो मिळुन आला नाही. सदर ठिकाणी पोलीसांनी छापा टाकला व ज्या ठिकाणी तो उभा होता त्याठिकाणी येवून त्याचे नावाची विचारपुस केली असता त्याचे नाव काळु लक्ष्मण पवार असल्याचे समजले. त्यानंतर तो उभा असलेल्या ठिकाणची झडती घेतली असता त्या ठिकाणी एका लोखंडी टिपाडात २१,०००/- रू. किंमतीची ३० लिटर गावठी हात भट्टीची दारू तयार करण्याचे कच्चे रसायन मिळून आले व एका प्लॅस्टीक ड्रममध्ये २० लिटर आंबट उग्र वास येत असलेली रक्कम रूपये २०००/- किंमतीची गावठी हातभट्टीची तयार दारू मिळून आली. त्यानंतर गुन्हयाचा माल मिळून आल्याने दोन पंचांसमक्ष तो जागीच जप्त करून सहाय्यक फौजदार आरोळे यांनी त्याचा सविस्तर पंचनामा केला व सदर जप्त मालातुन प्रत्येकी एक-एक १८० मिलीच्या क्वार्टर साईज बाटलीमध्ये सदर गावठी हातभट्टीची तयार दारू भरून त्या बाटलीस पोलीसांचे व पंचांचे सहयाचे कागदी सिल जागीच केले व सदर बाटली केमिकल तपासणी कामी राखून ठेवून उर्वरित माल पंचांसमक्ष जागीच नष्ट केला. त्यामधून तपासणी करीता १८० मिली दारू एका काचेच्या बाटलीत भरून त्यावर सहाय्यक फौजदार आव्हाड यांचे व पंचाचे सहयांचे कागदी सिल चिटकवून बाकी मिळुन आलेली तयार दारू जागीच नष्ट केली. त्यानंतर ते पोलीस ठाण्यात आले व त्यांनी आरोपीविरुध्द फिर्याद दिली.

३. फिर्यादीनुसार आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(फ), (क), (ड) आणि (ई) अन्वये राहुरी पोलिस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. III १२१८/२०२२ नोंदविण्यात आला. तपास अधिकारी यांनी तपासकामी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, पंचनामा केला, मुददेमाल रासायनिक तपासणीकरिता पाठविला व तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर निशाणी ६ प्रमाणे आरोपीचे प्रतिकथन नोंदविले. त्यामध्ये आरोपीने त्याला गुन्हा कबूल नसल्याचे कथन केले व खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. प्रस्तुत आरोपीविरूद्ध कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ (१) (ब) अन्वये

निवेदन नोंदविण्यात आले नाही.

५. अभियोग पक्षाचे कथन, दोषारोप, अभियोग पक्षाचा पुरावा आणि आरोपीचे जबाब यांचा विचार करता उक्त मुद्दे विवेचनाकरिता उपस्थित झाले आहेत. सदर मुदयांवरील माझे निष्कर्ष आणि निष्कर्षाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक २७.११.२०२२ रोजी सकाळी ०६.३० वाजेच्या सुमारास मौजे सात्रळ, ता. राहुरी, जि. अहमदनगर येथे आरोपी हा विनापरवाना एका लोखंडी टिपाडात २१,०००/– रू. किंमतीची ३० लिटर गावठी हात भट्टीची दारू तयार करण्याचे कच्चे रसायन व एका प्लॅस्टीक ड्रममध्ये २० लिटर आंबट उग्र वास येत असलेली रक्कम रूपये २०००/– किंमतीची गावठी हातभट्टीची तयार दारू जवळ बाळगून त्याची विक्री करत होता ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे का ? | नाही. |
| २. | काय आदेश ? | आरोपीस निर्दोष सोडण्यात येते. |

## **: कारणमिमांसा :**

६. आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने पंच साक्षीदार क्र.१ बबन रूपला जाधव व साक्षीदार क्र.२ जनार्दन बाबुराव हिवाळे यांच्या साक्षी पुराव्याचा आधार घेतला आहे.

**मुददा क्र.१ बाबत** :–

७. आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी विचाराधीन असलेल्या मुददा क्र.१ च्या विवेचनासाठी फिर्यादीने दि.२७.११.२०२२ रोजी घटनास्थळी छापा टाकला व एका लोखंडी टिपाडात २१,०००/– रू. किंमतीची ३० लिटर गावठी हात भट्टीची दारू तयार करण्याचे कच्चे रसायन व एका प्लॅस्टीक ड्रममध्ये २० लिटर आंबट उग्र वास येत असलेली

रक्कम रूपये २०००/– किंमतीची गावठी हातभट्टीची तयार दारू आरोपी अवैधरित्या बाळगून होता, ही बाब विचारात घेतली.

८. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले पंच साक्षीदार क्र.१ बबन रूपला जाधव व साक्षीदार क्र.२ जनार्दन बाबुराव हिवाळे यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, त्यांना दि.२७.११.२०२२ रोजी पोलीसांनी पंचनाम्यावर सही करण्यासाठी राहुरी पोलीस स्टेशन येथे बोलावले होते. त्यादिवशी पोलीसांनी त्यांच्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन कोणतीही चीजवस्तु जप्त केली नाही. तसेच, कोणताही पंचनामा केला नाही. त्यानंतर त्यांना सदरचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर साक्षीदार क्र.१ बबन रूपला जाधव यांची पंच म्हणून अनुक्रमांक १ वर सही आहे व साक्षीदार क्र.२ जनार्दन बाबुराव हिवाळे यांची पंच म्हणून अनुक्रमांक २ वर सही आहे. पंच साक्षीदारांनी पंचनाम्यावरील त्यांची सही अनुक्रमे (नि. पी. १) व (नि. पी. २) ही ओळखली. परंतु, पंचनाम्यातील मजकुर त्यांना पोलीसांनी वाचून दाखविला नसून तो त्यांना माहीत नसल्याचे कथन केले आहे. पंच साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य न केल्याने त्यांना सरकारी वकिलांनी उत्तरसूचक प्रश्न विचारले. परंतु, त्यातुनही आरोपीच्या ताब्यातुन पोलीसांनी त्यांचेसमक्ष गावठी हातभटटी दारु जप्त केली असे निष्पन्न झाले नाही. त्यामुळे पंचनामा सिध्द झाला नाही.

९. उपरोक्त बाबींचा विचार करता, आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला मुददेमाल हा गावठी हातभट्टीची दारू होती ही बाब अभियोग पक्षाने निःसंदिग्धपणे सिध्द केली आहे का, हे तपासणे आवश्यक व क्रमप्राप्त ठरते. अभिलेखावरील कागदपत्रांची पाहणी केली असता असे दिसुन येते की, रासायनिक विश्लेषणाकरिता नमुना काढण्यात आला होता हे कथन केलेले आहे. परंतु रासायनिक परिक्षणाचा अहवाल प्रस्तुतकामी दाखल केलेला नाही. त्यामुळे जप्त मुददेमाल हा गावठी हातभट्टीची दारू होती हे स्पष्ट होत नाही.

१०. वरील सर्व बाबींमुळे फिर्यादी व त्याचे सहकारी पंचांसोबत छापा मारण्यासाठी घटनास्थळावर गेले होते याबाबत शंका उत्पन्न होते. अभियोगपक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हयाच्या सिध्दतेकरिता इतर कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची साक्ष याकामी नोंदविण्यात आलेली नाही. तपासण्यात आलेल्या पंच साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. त्याचप्रमाणे प्रस्तूत कामी तपास अधिकारी यांच्या साक्षी नोंदविण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे पंचनामा सिध्द झाला नाही. त्यामुळे अभियोगपक्ष हा आरोपीविरुध्द ठेवलेला आरोप सिध्द

करणेस पुर्णपणे अपयशी ठरला आहे. म्हणून मी मुददा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुददा क्र.२ बाबतः</u>**–

११. वरील सर्व कारणांचा उहापोह करता व मुद्दा क्र.१ चे निष्कर्षाचा विचार करता आरोपी त्याचेविरुध्दचे आरोपामधून निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. आज रोजी देखील आरोपी गैरहजर असल्याने आज रोजी सदरचा न्यायनिर्णय हा निर्दोष मुक्ततेचा असल्याकारणाने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३५३(६) अन्वये आरोपीच्या गैरहजेरीत उद्घोषित करण्यात आला. सबब मी मुददा क्र.२ च्या निष्कर्षाकरिता खालील प्रमाणे आदेश पारीत करित आहे.

## : <u>आदेश</u> :

१. आरोपी **काळु उर्फ मुन्ना लक्ष्मण पवार** यास मुंबई दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(फ), (क), (ड) आणि (ई) अन्वये शिक्षेस पात्र अपराधाच्या आरोपामधून फौजदारी प्रक्रीया संहीता कलम २५५(१) नुसार दोषमुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जामिनपत्र व वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ नुसार रक्कम रुपये १५,०००/– चे जामिनपत्र व बंधपत्र सादर करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात आरोपीच्या विधीज्ञांच्या हजेरीत व आरोपीच्या गैरहजेरीत फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३५३(६) अन्वये उद्घोषित करण्यात आले).

ADITYA KRISHNA SHINDE
2026.01.09 11:42:02 +0530

दिनांक – ०७/०१/२०२६
राहुरी.

**(आदित्य कृ. शिंदे)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
(न्यायालय क्र. ३), राहुरी.